# कोरोना औषधांच्या काळ्याबाजाराला लगाम

**मुंबई :** कोरोना रुग्णांवरील उपचारांसाठी प्रभावी ठरणा-या रेमडेसिवीर आणि टोसिलीझूमँब या औषधांची मागणी आणि पुरवठा यांच्यात प्रचंड तफावत निर्माण झाल्याने जून आणि जुलै महिन्यांत त्यांचा काळाबाजार तेजीत होता. मात्र, गेल्या महिन्याभरात वाढलेली उपलब्धता, वापराबाबतची मार्गदर्शक तत्वे जाहीर करून त्यावर आणलेले नियंत्रण, पोलीस तसेच अन्न व औषध प्रशासनाने केलेली कारवाई आदी अनेक कारणांमुळे या औषधांच्या काळ्याबाजाराला लगाम लागला आहे.



गंभीर आणि अतिगंभीर रुग्णांवर रेडेसिवीर आणि टोसिलीझूमँब या औषधांची मात्रा लागू पडत असल्याचे लक्षात आल्यानंतर जून महिन्यात त्यांचा अनिर्बंध वापर सुरू झाला होता. ही औषधे कोणत्या रुग्णाला, कधी आणि किती प्रमाणात द्यायची याबाबत एकवाक्यता नव्हती. औषधांची उपलब्धता अत्यंत मर्यादीत प्रमाणात होती.

औषध विक्रेत्यांकडे ती उपलब्ध होत नसतानाही डॉक्टर सर्सार चिठ्ठी लिहून देत हहोते. मागणी आणि पुरवठ्यात तफावत असल्याने औषधे मिळवताना रुग्णांचे नातेवाईक अक्षरश: रडकूंडीला येत होते. ३१,५०० रुपये किंमत असलेली टोसिलीझूमँब (४०० एमजी) जवळफास ८० हजार रुपयांपर्यंत विकले जात होते. तर, रेमडेसिवीर विक्रीची परवानगीच नसल्याने निर्यातीसाठी तयार केलेले किंवा बांगलादेशातून आणलेल्या औषधांची ३० ते ४० हजार रुपयांनाही (सात ते आठ पट जास्त किंमतीत) विक्री केली जात होती. परंतु, आता मनमानी किंमतीतला हा काळाबाजार जवळपास बंद झाला आहे.

## औषधांचा तुटवडा नाही

राज्य सरकारच्या टास्क फोर्सने ही दोन्ही औषधे कोणत्या रुग्णांना, कधी आणि किती प्रमाणात द्यायचे याची मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. तसेच, या औषधांच्या अनियंत्रित वापराचे दुष्परिणामही सांगण्यात आल्याने त्यांचा वापरही नियंत्रणात आला आहे. गेल्या काही दिवसांत विशेषतः मुंबई शहरांतील रुग्णसंख्यासुध्दा कमी झाल्याने औषधांची मागणीसुध्दा घटली आहे.

औषध निर्मिती कंपन्यांनी थेट रुग्णालयांमार्फत पुरवठा करत असून रुग्णांच्या कागदपत्रांची पडताळणी केल्याशिवाय औषध उपलब्ध करून दिले जात नाही. या सर्व कारणांमुळे मुंबई आणि महानगर क्षेत्रातील कोरोना औषधांचा काळाबाजार थांबला असून या औषधांचा तुटवडा नसल्याची माहिती राज्य शासनाच्या टास्क फोर्सचे सदस्य आणि फोर्टीस हॉस्पिटलच्या इंन्टेसीव केअर युनिटचे प्रमुख डॉ. राहूल पंडित यांनी सांगितले.

## औषधांसाठीची धडपड थांबली

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तीन भारतीय कंपन्यांनी रेमडेसीवीर औषध ४५०० ते ५६०० रुपये किंमतीत उपलब्ध करून देण्यास सुरूवात केल्यानंतर औषधांची उपलब्धता वाढली आहे. औषधांसाठी रुग्णांच्या नातेवाईकांना वणवण करावी लागते असे कुठे दिसत नाही. जून जुलै, महिन्यांत सोशल मीडीयावर औषधे कुठे उपलब्ध होतील असे मेसेज सतत येत होते. तेसुध्दा आता येत नाहीत. औषधांचा काळाबाजार रोखण्यासाठी दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावरही तक्रारी येत नसल्याचे एफडीएच्या अधिका-यांनी सांगितले. औषधांचा काळाबाजार करण्याचे प्रमाण वाढल्यानंतर पोलीस तसेच अन्न व औषध प्रशान विभागाने संयुक्त कारवाई करून ठाणे, मीरा रोड, मुंबईत सापळा रचून भामट्यांना गजाआड टाकले होते. त्याचाही परिणाम झाल्याचे सांगितले जाते.

# एकच सवाल : उपनगरातील मोडकळीस आलेल्या भाडेकरू इमारतींचे काय

मुंबईः मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या बाबतीतला निर्णय घेतला, परंतु उपनगरातील मोडकळीस आलेल्या भाडेकरू इमारतींचे काय? असा प्रश्न कांदिवली पूर्व विधानसभा मतदार संघाचे भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिलेल्या पत्रात उपस्थित केला आहे. मुंबईच्या उपनगरात सुद्धा मोडकळीस आलेल्या व पुनर्विकासाची गरज असलेल्या हजारो इमारती आहेत, यातील हजारो रहिवाशांना पुनर्विकासाच्या नावाखाली विकासकांनी रस्त्यावर आणले आहे.



तसेच मोडकळीस आल्या म्हणून भाडेकरूंना बेघर करण्याचे मोठे षडयंत्र विकासक करत आहेत. पण त्यांच्याकडे कोण लक्ष देणार? असा प्रश्नही आमदार भातखळकर यांनी मुख्यमंत्र्यांना विचारला आहे. उपकरप्राप्त इमारती या फक्त मुंबई शहरातील आहेत, उपनगरातील भाडेकरू इमारतींच्या बाबतीत माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळामध्ये एक धोरण आखले होते व ते विधी खात्याकडे प्रलंबित आहे, त्यावर सुद्धा तात्काळ निर्णय करण्याची आवश्यकता आहे. इनसॉलव्हन्सी आणि बँकरप्टसी अश्या कोड सारखा एखादा कायदा करून ज्या भाडेतत्त्वावरील इमारतींचा विकास वर्षानुवर्ष रखडलेला आहे त्या पुनर्विकासाच्या बाबतीत निर्णय घेणारा आणि भाडेकरूंना दिलासा देणारा एक कायदा करण्याची आवश्यकता असल्याचा मुद्दा आपण हे गेले काही वर्ष मांडत असल्याचे त्यांनी पत्रकात नमूद केले आहे. आधीच्या सरकारच्या काळात ही पावले उचलली गेली. त्यामुळे त्याची तात्काळ पूर्तता करून उपनगरातील भाडेकरूंना व अशा प्रकारच्या इमारतीत राहणाऱ्या लाखो लोकांना दिलासा द्यावा व त्यांच्या पुनर्विकासाचा रखडलेला मार्ग मोकळा करावा अशी मागणी आमदार भातखळकर यांनी शेवटी केली आहे.

# कोरोनामुळे रखडला अंबरनाथ नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचा पगार

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपालिकेतील ८०० हून अधिक कर्मचाऱ्यांचा पगार एक तारखेला बँकेत जमा न झाल्याने कर्मचा*यांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. तब्बल बारा दिवस उलटले तरी पगार न झाल्याने कर्मचा*यांनी पालिका प्रशासनाला याकडे लक्ष देण्याची विनंती केली होती. त्यानंतर पालिका प्रशासनाने कर्मचा*यांचे पगार देण्याची प्रक्रिया सुरु केली. अंबरनाथ पालिकेतील आस्थापना विभागातील कर्मचा*यांना कोरोनाची ड्युटी लावण्यात आल्याने त्या कर्मचा*यांना आपली कार्यालयीन कामे करता आलेली नाहीत. त्यामुळे पगाराची प्रक्रिया लांबली.

## लवकरच करणार सर्वांचा पगार

पालिका कर्मचा*यांचा पगार एक ऑगस्टला होणे अपेक्षित होते. मात्र त्यासंदर्भातील कोणतीच कार्यवाही न झाल्याने अकाउंटस डिपार्टमेंटला पगार जमा करण्यासंदर्भात अडचणी निर्माण झाल्या. तब्बल बारा दिवस उलटले तरी कर्मचा*यांचा पगार जमा न झाल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. कोरोनासारख्या भयानक आजाराशी जीवावर उदार होऊन कर्मचारी लढत असताना त्यांची आर्थिक कोंडी होणार नाही, याकडे पालिका प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे होते. वेळेवर पगार न झाल्याने अनेक कर्मचा*यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. सेवानिवृत्त कर्मचा*यांच्या खात्यात पेन्शनही वेळेवर जमा झाली नसल्याने या कुटुंबांची आर्थिक कोंडी झाली. तब्बल १० दिवसांनंतर त्यांची पेन्शन जमा झाल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले. दुसरीकडे कर्मचा*यांच्या पगाराबाबत स्पष्टीकरण देताना पालिकेतील बहुसंख्याक कर्मचारी हे कोरोनाच्या ड्युटीवर असल्याने पगारास विलंब झाल्याचे प्रशासनाने मान्य केले.

# राष्ट्रवादीच्या रणनीतीचा भाजपाला फटका?

**मुंबई :** राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पार्थ पवार यांची कानउघडणी केल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार नाराज झाल्याची चर्चा होती. मात्र त्यानंतर शरद पवार यांच्या निवासस्थानी राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला अजितदादाही उपस्थित होते. या बैठकीत राष्ट्रवादीच्या पुढील रणनीतीबद्दल चर्चा झाल्याची माहिती आहे. यामध्ये सर्वात मुख्य म्हणजे विधानसभा निवडणुकीपूर्वी जे लोक राष्ट्रवादीसोडून भाजपात गेले होते अशा नेत्यांना पुन्हा पक्षात घेण्याबाबत व्यूहरचना आखण्यात आल्याची माहिती आहे. याबैठकीला शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील यांच्यासह अन्य प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. महाविकास आघाडीतल्या तिन्ही पक्षाचं राजकारण आणि ताकद ओळखून त्या त्या जिल्ह्यात नेत्यांना पुन्हा पक्षात घेण्याचा विचार सुरु आहे.



पक्ष सोडून गेलेल्या कोणत्या नेत्यांना राष्ट्रवादीत परत घ्यायचं याची जबाबदारी जयंत पाटील आणि अजित पवारांवर दिली आहे. अलीकडेच राष्ट्रवादीचे मंत्री नवाब मलिक यांनी भाजपात गेलेले नेते पक्षात येण्यास उत्सुक आहेत, पण अद्याप त्यावर निर्णय झाला नाही. लवकरच कळवलं जाईल असं म्हटलं होतं.

## शरद पवारांनी अजितदादांवर सोपवली नवी जबाबदारी

त्यामुळे बुधवारच्या बैठकीत या संदर्भात चर्चा झाल्याची माहिती आहे. राज्यात शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी यांच्या महाविकास आघाडीचं सरकार आहे. त्यामुळे भाजपातील कोणते नेत्यांचा अथवा आमदारांचा राष्ट्रवादीत प्रवेश करुन घ्यायचा याबाबत हालचाली सुरु आहेत, तसेच प्रवेश देण्यापूर्वी मित्रपक्ष शिवसेना-काँग्रेसला विश्वासात घेतलं जाईल असंही सांगण्यात आलं आहे. तर याबाबत छगन भुजबळ यांनी सांगितले आहे की, भाजपाचे काही आमदार आमच्या संपर्कात असतील तर त्यांची नावे जाहीर करणार नाही, ते आमदार राजीनामा देऊन आले तर त्यांना महाविकास आघाडी पुन्हा निवडून आणू शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पार्थ पवारांवरुन अजितदादा नाराज?

बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंग राजपूत यांच्या सीबीआय चौकशीची मागणी आणि राम मंदिराच्या निर्माणावेळी शुभेच्छा दिल्यानंतर पार्थ पवार यांच्यावर शरद पवारांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. मी माझ्या नातवाच्या मागणीला कवडीचीही किंमत देत नाही, तो इमॅच्युर आहे अशा शब्दात पवारांनी पार्थला फटकारलं होतं. त्यानंतर पार्थ पवारांनी याविषयी काही बोलण्यास नकार दिला मात्र या प्रकरणावरुन राजकीय वर्तुळात अजित पवार हे नाराज झाल्याची चर्चा उठली होती.

# “महाविकास आघाडीच्या मंत्र्यांकडून बदल्यांमध्ये प्रचंड कमाई

**मुंबई :** राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांनी पंधरा टक्के बदल्यांच्या नावाखाली अनेक मलाईदार ठिकाणी मर्जीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या करून प्रचंड पैसा गोळा केला आहे. याची सीआयडीकडून चौकशी करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वित्त खात्याने बदल्या करू नयेत असा आदेश दिला असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सामान्य प्रशासन विभागाने बदल्यांवरील स्थगिती उठवली, हे आश्चर्यकारक आहे, असे ते म्हणाले. याबाबत चंद्रकांत पाटील म्हणाले की, राज्य सरकारने कोरोनामुळे बदल्या रोखल्या होत्या पण नंतर पंधरा टक्के बदल्यांना परवानगी देऊन त्यावरील स्थगिती उठविली. परिणामी महाविकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांनी मलाईदार ठिकाणी बदली करून देण्याचा बाजार मांडला.

## सीआयडी चौकशी करा



यामध्ये फार मोठ्या रकमेची उलाढाल झाली. तसेच ज्यांचे राजकीय लागेबांधे नाहीत आणि ज्यांच्याकडे आर्थिक बळ नाही अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला. या सर्व प्रकरणाची सीआयडीकडून चौकशी करण्याची गरज आहे असं त्यांनी सांगितले. तसेच मुळात कोरोनाविषयीच्या उपाययोजनात सातत्य राखण्यासाठी चालू वित्तीय वर्षात बदल्या करू नयेत, असे सरकारचे मे महिन्यात धोरण होते तर जुलै महिन्यात राज्यातील कोरोनाची साथ अधिक गंभीर झाली असताना एकूण कार्यरत पदांच्या पंधरा टक्के बदल्या करण्याचा आदेश देण्याचे कारणच नव्हते.

तसेच नंतर त्याला १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्याचेही कारण नव्हते. राज्य सरकारच्या या धोरणातील गोंधळामुळे कोरोनाचे संकट असताना मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबाचे स्थलांतर करण्याची वेळ आली. कोरोनामुळे शाळा बंद असताना मुलांसाठी नव्या ठिकाणी शाळेत प्रवेश मिळविण्याचे आव्हानही निर्माण झाले. तसेच कोरोनाची साथ रोखण्याच्या प्रयत्नांमध्येही अडथळा आला असल्याचा आरोपही चंद्रकांत पाटलांनी केला. दरम्यान, कोरोनाच्या महासाथीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत राज्य सरकारच्या वित्त विभागाने ४ मे रोजी एक शासन निर्णय जारी केला व अनेक निर्बंध लादले. त्यामध्ये म्हटले होते की, चालू वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गातील अधिकारी अथवा कर्मचारी यांची बदली करू नये व याविषयीचा आदेश सामान्य प्रशासन विभागामार्फत देण्यात येईल. कोरोनाच्या अनुषंगाने विविध विभागांनी केलेल्या उपाययोजनांमध्ये सातत्य राहणे आवश्यक आहे, असे कारण बदल्यांवर बंदी घालण्यामागे देण्यात आले होते. सामान्य प्रशासन विभागाने वित्त विभागाच्या ४ मे रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने ७ जुलै रोजी आदेश काढला व ३१ जुलैपर्यंत पंधरा टक्के बदल्या कराव्यात असे स्पष्ट केले.

# गोकुळ जन्माष्टमी निमित्त सत्संग आयोजित करणाऱ्या आश्रमावर गुन्हा दाखल

उल्हासनगर : ईश्वर प्रेम आश्रमाने गोकुळ जन्माष्टमीचे औचित्य साधून सत्संगाचे आयोजन केल्या प्रकरणी हिललाईन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सत्संगला १०० महिला व पुरुष सहभागी झाले असून कोरोना संसर्गाची भीती व्यक्त होत आहे. उल्हासनगर कॅम्प नं-५ येथील ईश्वर प्रेम आश्रमात बुधवारी सकाळी साडे दहा वाजण्याच्या दरम्यान गोकुळ जन्माष्टमी निमित्त सत्संगचे आयोजन केले होते. विनापरवाना आयोजित केलेल्या सत्संगाला १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष सहभागी झाल्याची माहिती हिललाईन पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी घटनस्थळी धाव घेऊन विनापरवाना आयोजित केलेल्या सत्संग बाबत आश्रम चालकांना विचारणा केली. कोरोना महामारीत नागरिकांना सत्संगसाठी एकत्र जमाविल्याप्रकरणी आश्रमाच्या संगीता कारेरा, अशोक धसेजा, अनिता डींगारीया यांच्यासह ९ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलिस करीत आहेत.

# दादर-माहीममध्ये कृत्रिम तलाव

**मुंबई :** कोरोंनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता समुद्र चौपाटीवर गर्दी टाळावी यांसाठी दादर- माहीम परिसरात कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली होती त्यास पालिकेने संमती दर्शविली आहे. गणेशोत्सव काळात घरगुती गणेश मुरतींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्याचे आवाहन मुंबई महापालिकेने केले आहे. मात्र प्रत्यक्षात कृत्रिम तलावांची संख्या कमी आहे ही बाब निदर्शनास आणून देण्यासाठी मनसेचे उपाध्यक्ष व दादर-माहीम विधानसभा विभागअध्यक्ष यशवंत किल्लेदार यांनी आज परिमंडळ 2 चे पालिकेचे सहआयुक्त नरेंद्र बर्डे आणि जी उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त किरण दिघावकर यांची भेट घेत त्याना निवेदन सादर केले. दादर-माहीम परिसरात गणेश विसर्जनांसाठी कृत्रिम तलावांसाठी मनसेने जागा सुचविण्यात आल्या होत्या त्यानुसार पालिकेच्या जी उत्तर विभागाच्या वतीने दादर- माहीम परिसरात 7 ठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येणार असल्याचे आश्वासन पालिका प्रशासनाने दिले असल्याचे किल्लेदार यांनी सांगितले. शिवाजीपार्क येथील महानगर पालिका क्रीडा भवन, मृदुंगाचार्य मैदान, रमा गावंडे मैदान, प्रभादेवी येथील चवन्नी गल्ली मैदान व धारवीत तीन याठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येणार आहे.


**SAB EVENTS AND GOVERNANCE NOW Media Ltd**

CIN :L2222MH2014PLC254848

Regd. Office : 7th Floor, Adhikari Chambers, Oberoi Complex, New Link Road, Andheri (West), Mumbai 400 053 Tel. : 022-40230711, Fax : 022-26395459

Email : cs@governancenow.com Website: www.governancenow.com

**Extract of Un-audited Standalone Financial Results for the Quarter Ended 30th June, 2020**

Rs. in Lakhs (Except EPS)

| Sr. No. | Particulars | For Quarter Ended 30.06.2020 (Un-Audited) | 31.03.2020 (Audited) | 30.06.2019 (Un-Audited) | For Year Ended 31.03.2020 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations | 36.46 | 46.80 | 67.03 | 204.35 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (19.96) | (19.13) | (31.52) | (97.74) |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before Tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (19.96) | (19.13) | (31.52) | (97.74) |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after Tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (19.96) | (19.13) | (31.52) | (97.74) |
| 5 | Total Comprehensive Income for the period after tax [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and other comprehensive Income (after tax)] | (19.96) | (23.63) | (24.16) | (94.87) |
| 6 | Paid-up Equity Share Capital (face value of Rs.10/- each) | 1,048.37 | 1,048.37 | 1,048.37 | 1,048.37 |
| 7 | Reserves (Excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | | (700.62) |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) | | | | |
| | Basic | (0.19) | (0.18) | (0.30) | (0.93) |
| | Diluted | (0.19) | (0.18) | (0.30) | (0.93) |

**Notes:**

1 The above is an extract of the detailed format of Quarterly Un-audited Financial Results of the Company filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, which have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on Wednesday, August 12, 2020. The same is available on website of the company www.governancenow.com and website of BSE Limited www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited on www.nseindia.com where shares of the Company are listed.

2 A Limited Review as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 has been carried out by the Statutory Auditors on the detailed Un-audited Financial Results for the quarter ended June 30, 2020 filed with the Stock Exchanges.

3 The Company is operating in a single segment viz. Digital Media Websites & MICE, Hence, the results are reported on a single segment basis.

4 Previous period/ year's figures have been reclassified /regrouped wherever necessary to confirm with the current accounting treatement.

By Order of the Board of Directors
For SAB Events & Governance Now Media Ltd.
Markand Adhikari
Sd/-
Chairman
DIN :00032016

Place : Mumbai
Date: August 12, 2020



**TV VISION LTD**

A SRI ADHIKARI BROTHERS ENTERPRISE

CIN : L64200MH2007PLC172707

Regd. Office : 4th Floor, Adhikari Chambers, Oberoi Complex, New Link Road, Andheri (West), Mumbai - 400 053

Tel. : 022-4023 0673/022-40230000; Fax : 022-26395459; Email : cs@tvvision.in; Website: www.tvvision.in

**EXTRACT OF UNAUDITED STANDALONE AND CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2020**

(Rs. in Lakhs, Except EPS)

| Sr. No. | Particulars | Standalone Quarter Ended 30-Jun-20 Unaudited | Standalone 31-Mar-20 Audited | Standalone 30-Jun-19 Unaudited | Standalone Year Ended 31-Mar-20 Audited | Consolidated Quarter Ended 30-Jun-20 Unaudited | Consolidated 31-Mar-20 Audited | Consolidated 30-Jun-19 Unaudited | Consolidated Year Ended 31-Mar-20 Audited |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations (net) | 637.60 | 2,452.82 | 3,432.18 | 10,971.72 | 637.60 | 2,452.82 | 3,432.18 | 10,971.72 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (2,166.52) | (890.68) | (250.83) | (2,877.51) | (2,167.42) | (891.72) | (251.10) | (2,890.02) |
| 3 | Net Profit/(Loss) for the period (before Tax (after) Exceptional and/or Extraordinary items) | (2,166.52) | (890.68) | (250.83) | (2,877.51) | (2,167.42) | (1,008.87) | (251.10) | (3,007.17) |
| 4 | Net Profit/(Loss) for the period (after Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (2,166.52) | (890.68) | (250.83) | (2,877.51) | (2,167.42) | (1,008.87) | (251.10) | (3,007.17) |
| 5 | Total Comprehensive Income for the period after tax [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and other comprehensive Income (after tax)] | (2,167.58) | (879.18) | (253.24) | (2,873.24) | (2,168.49) | (997.37) | (253.51) | (3,002.90) |
| 6 | Paid-up Equity Share Capital (face value of Rs.10/- each) | 3,494.45 | 3,494.45 | 3,494.45 | 3,494.45 | 3,494.45 | 3,494.45 | 3,494.45 | 3,494.45 |
| 7 | Reserves (Excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | 619.96 | - | 619.96 | - | (2,723.30) | - | (2,723.30) |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) | | | | | | | | |
| | Basic | (6.20) | (2.55) | (0.72) | (8.23) | (6.20) | (2.89) | (0.72) | (8.61) |
| | Diluted | (6.20) | (2.55) | (0.72) | (8.23) | (6.20) | (2.89) | (0.72) | (8.61) |

**Notes :**

1 The above Un-audited Standalone & Consolidated Financial Results of the Company have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on Wednesday, August 12, 2020. The Statutory Auditors have carried out the limited review of these Un-audited Standalone & Consolidated Financial Results for the quarter ended June 30, 2020 and the same are made available on website of the company www.tvvision.com and website of BSE Limited www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited on www.nseindia.com where shares of the Company are listed.

2 The Standalone & Consolidated Un-audited Financial Results for the quarter ended June 30, 2020, have been prepared in accordance with recognition and measurement principles laid down in the Indian Accounting Standards (Ind AS) prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued thereunder and other accounting principles generally accepted in India.

3 The Company is operating in a single segment viz. Broadcasting , Hence, the results are reported on a single segment basis.

4 Previous period/ year's figures have been reclassified /regrouped wherever necessary to confirm with the current accounting treatement.

By Order of the Board of Directors
For TV Vision Limited
Sd/-
Markand Adhikari
Chairman & Managing Director
DIN: 00032016

Place : Mumbai
Date : 12th August , 2020